आकेलाक्र 1993010422

जमीन एकत्रिकरण योजनेच्या कामास स्थगिती, तसेच दिलेल्या स्थगितीमुळे अतिरिक्त ठरणा-या अधिकारी/कर्मचारीवर्गास भूमि अभिलेख खात्यातील अन्य कामासाठी वापरणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्र. आस्थापना-१०९२/प्र.क्र.८००६/ल-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ४.१.१९९३.

वाचा :

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र. इस्टटी-७१४/ई-४/९२, दि. ७.१२.१९९२.

निर्णय :

मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबतच्या व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबतच्या अधिनियम, १९४७ च्या अंमलबजावणीबाबत अनेक अडचणी उद्भवल्यामुळे या अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत पुनर्विचार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. पुनर्विचाराअंती आता या अधिनियमाची अंमलबजावणी स्थगित करण्याचा व या योजनेत गुंतलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना भूमि अभिलेख विभागातील इतर कामासाठी वापरण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

भूमि अभिलेख विभागाच्या पुनर्रचनेची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याला अंतिम मान्यता मिळेपर्यंत भूमि अभिलेख विभागातील जमीन एकत्रिकरण योजनेसाठी काम करणा-या अधिकारी/कर्मचारी वर्गास खालील कामे देण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र. इस्टटी-७१४/ई-४/९२, दि. ७.१२.१९९२ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास खालील नमूद केलेल्या अटी/शर्तीच्या अधीन राहण्याच्या अटीवर या निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

१.] ज्या गावचे एकत्रिकरण योजनेचे काम पूर्ण झाले आहे त्याचे अंतिम टप्प्यातील शिल्लक काम पूर्ण करणे, तथापि, सदर काम दि. २८.३.१९९३ अखेरपर्यंत पूर्ण होईल याची कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी व कोणत्याही नवीन गावाचे यापुढे एकत्रिकरण योजनेअंतर्गत काम सुरु करु नये.

२] भूमि अभिलेख विभाग अद्यावत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याने व अभिलेखाचे संगणीकरण करण्याची आवश्यकता असल्याने ज्या जिल्हयात भूमि अभिलेखाचे पुनर्लेखन अद्याप झाले नाही त्या जिल्हयातील भूमि अभिलेखाचे पुनर्लेखन करणे.

... शहरी संगणाचे अतिरिक्त मोजणी काम करणे.

५] महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १२६ खाली ज्या गावचे भूमापनाचे काम पूर्ण झाले आहे त्या गावचे परिरक्षणाचे काम सुरु करणे,

६] वरील कामे एकत्रिकरण योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या व अतिरिक्त ठरलेल्या अधिकारी/कर्मचारीवर्गाकडूनच केली जातील व सदर कामामुळे जादा पदे निर्माण होणार नाहीत व शासनावर जादा आर्थिक बोजा पडणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारीवर्गाचा वेतन व भत्त्यांचा खर्च भूमि अभिलेख विभागास मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स. भा. चिंदरकर
[स. भा. चिंदरकर]
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

प्रति,

जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व महसूल विभागीय आयुक्त,
उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती
सर्व जिल्हाधिकारी,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], १-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
महालेखापाल [ लेखापरीक्षा ] १-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे,
वित्त विभाग, व्यय-१०,
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग,
कार्यासन अधिकारी, पीएसी-२ आणि ब-२ कार्यासन, महसूल व वन विभाग,
ल-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. [ निवडनस्ती ].
मा. मंत्री [महसूल ] यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री [महसूल], यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

S-217